आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१८ ऑक्टोबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप आणि मित्रपक्षांना पराभवाची भीती वाटत असल्यानं मतदार याद्यांमध्ये फेरफार करण्याचा प्रयत्न होत असल्याचा महाविकास आघाडीचा आरोप

- राज्यात निवडणूक आचारसंहितेची अंमलबजावणी करताना प्रशासनाची विविध ठिकाणी कारवाई

- युद्धाच्या नवनवीन प्रकारांमुळे संरक्षण क्षेत्रात नवी आव्हानं उभी राहत असल्यानं युवक आणि खासगी उद्योगाने नवोन्मेषात पुढाकार घ्यावा, असं संरक्षण मंत्र्यांचं आवाहन

- झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना आज जारी

**आणि**

- बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी प्रमुख आरोपी शिवकुमार गौतम याच्यासह तिघांविरोधात लुक आऊट नोटीस

**<><><><><>**

महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप आणि मित्रपक्षांना पराभवाची भीती वाटत असल्यानं मतदार याद्यांमध्ये फेरफार करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला आहे. या आणि इतर विषयांमध्ये निवडणूक आयोगानं लक्ष घालून कारवाई करावी,

या मागणीसाठी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांची भेट घेणार असल्याची माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अनिल देसाई, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड आणि इतर महाविकास आघाडीच्या इतर नेत्यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. लोकसभा निवडणुकीत ज्या ठिकाणी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना जास्त मतं मिळाली, तिथं मतदार याद्यांमध्ये फेरफार करून नावं कमी करण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत असल्याचा आरोपही महाविकास आघाडीनं केला. तसंच सात क्रमांकाच्या अर्जाद्वारे मतदार नोंदणी करण्याची प्रक्रियाच संशयास्पद असून त्याबद्दल श्वेतपत्रिका काढण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना हटवायला निवडणूक आयोगानं नकार दिल्यावरूनही त्यांनी आयोगावर टीका केली. सरकारच्या योजनादूत योजनेद्वारे जनतेच्या पैशाची उधळपट्टी होत असून ही योजना रद्द करावी, अशी मागणीही निवडणूक अधिकाऱ्यांकडे करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. ज्येष्ठ आणि दिव्यांग नागरिकांसाठी घरी जाऊन मतदानाची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीनं पार पडावी, ही मागणी करून, निवडणुकीच्या या काळात नागरिकांनी जागरूक राहावं, यादीतलं आपलं नाव वारंवार तपासून घ्यावं, असं आवाहन नाना पटोले यांनी केलं.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी नाव मतदार यादीत असणं आवश्यक आहे. ज्या पात्र

मतदारांनी आपलं नाव मतदार यादीत अजूनही समाविष्ट केलेलं नाही, त्यांना उद्यापर्यंत म्हणजे १९ ऑक्टोबरपर्यंत मतदार यादीत आपलं नाव नोंदवण्याची संधी आहे. असं आवाहन महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणूक पारदर्शक तसंच निर्भय वातावरणात पार पाडण्याकरता मुंबईत आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी सुरु आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर गेल्या दोन दिवसांत **बृहन्मुंबई** महानगर पालिकेनं सुमारे ७ हजार ३८९ भित्तीपत्रकं, फलक, झेंडे आदी अनधिकृत जाहिरात साहित्य हटवलं आहे.

निवडणूक काळात कुठंही गैरप्रकार घडू नयेत यासाठी **रायगड** जिल्हा प्रशासन सज्ज झालं आहे. निवडणूक आचारसंहितेसंबंधीची कारवाई म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागानं रायगडमध्ये २ लाख ७१ हजार ४२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

विधानसभा निवडणुक शांततेत पार पाडण्यासाठी **सिंधुदुर्ग** जिल्हा पोलीस दल सज्ज झाल आहे. दारुसह इतर अंमली पदार्थाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी जिल्ह्यात तपासणी नाके कार्यान्वित करण्यात आले आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी **लातूर शहर आणि लातूर ग्रामीण** विधानसभा मतदारसंघा अंतर्गत नियुक्त करण्यात आलेले सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि विविध पथकांचे नोडल अधिकारी यांच्या कामकाजाचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी काल घेतला, तसंच निवडणूक प्रक्रिया शांततेनं पार पाडण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. स्थिर निगराणी

पथकं आणि भरारी पथकांनी दक्ष रहावं, कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास तातडीने कार्यवाही करून, त्याबाबतचा अहवाल संबंधित नोडल अधिकाऱ्यांना सादर करावा, आदी सूचनाही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या.

<><><><><>

माजी आमदार राजन तेली यांनी भाजपाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि सावंतवाडी विधानसभा प्रमुख पदाचा राजीनामा दिला आहे. भाजपा मधे राणे कुटुंबियांकडून त्रास होत असल्याकारणाने राजीनामा देत असल्याचं त्यांनी आपल्या राजीनाम्यात म्हटलं आहे. त्यांनी आपला राजीनामा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्याकडे पाठवला आहे.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **नंदुरबार आणि धुळे** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

युद्धाच्या नवनवीन प्रकारांमुळे संरक्षण क्षेत्रात नवी आव्हानं उभी राहत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेतर्फे आयोजित डेअर टू ड्रीम फाईव्ह पॉईंट झीरो या नवोन्मेष स्पर्धेचं उद्घाटन करताना आज ते बोलत होते. तंत्रज्ञानाच्या

प्रगतीमुळे ड्रोन, सायबर युद्ध, जैविक शस्त्र, असे नवनवीन मार्ग युद्धासाठी वापरले जातात, अंतराळातली संरक्षण व्यवस्था हे देखील नवीन आव्हान असल्याचं ते म्हणाले. या पार्श्वभूमीवर युवकांनी आणि खासगी क्षेत्रानं संरक्षण क्षेत्रात पुढाकार घ्यावा असं आवाहन त्यांनी केलं. संरक्षण क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान यावं यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाल. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांचं त्यांनी कौतुक केलं.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. २५ ऑक्टोबरपर्यंत यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. २८ तारखेला अर्जांची छाननी होईल आणि ३० ऑक्टोबर ही अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यात ४३ मतदारसंघांमधे १३ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. राज्यात सर्वच राजकीय आघाड्यांमध्ये जागावाटपाबाबतच्या चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत. राज्यात भाजपा, एजेएसयू, संयुक्त जनता दल आणि चिराग पासवान यांच्या एलजीपी पक्षांनी आघाडी केली असून झारखंड मुक्ती मोर्चा काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि मार्क्सवादी पक्षासोबत निवडणूक लढवणार आहे.

दरम्यान राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं जागावाटप जाहीर झालं असून भाजपा -६८- जागा लढवणार आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीर केंद्र शासित प्रदेशातल्या नवीन सरकारने आज मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर केलं. ज्या विभागांचं वाटप मंत्र्यांना झालेलं

नाही ते सर्व विभाग किंवा विषय हे मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारित असतील, असे आदेश नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी दिले आहेत.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी प्रमुख आरोपी शिवकुमार गौतम याच्यासह तिघांविरोधात मुंबई पोलिसांनी लुक आऊट नोटीस जारी केली आहे. यात शुभम लोणकर आणि मोहम्मद जिशान अख्तर यांचा समावेश आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी मुंबई पोलिसांच्या गुन्हे विभागाची पथकं देशाच्या विविध भागात रवाना झाली आहेत.

दरम्यान,या प्रकरणातला एक आरोपी गुरमेल याच्या हरियाणातील कथैल गावातही मुंबई पोलिसांच्या  गुन्हे शाखेचे अधिकारी चौकशीसाठी गेले आहेत. तिथं त्याच्या मित्रांची सखोल चौकशी केली जात आहे.

**<><><><>**

ज्येष्ठ संस्कृत अभ्यासक आणि पुण्यातल्या शारदा ज्ञान पीठमचे संस्थापक पंडित वसंतराव गाडगीळ यांचं काल वृद्धापकाळानं निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. आज सकाळी त्यांच्या पार्थिवावर पुण्यातल्या वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संस्कृत अध्यापन, शारदा ज्ञानपीठाची स्थापना, शारदा संस्कृत मासिकाची सुरुवात असं त्यांचं कार्य आहे.

**<><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून परतीचा पाऊस सुरू आहे. गेल्या चोवीस तासात राजापूर तालुक्यात सर्वाधिक २९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून त्या खालोखाल लांज्यात २३ मिलीमीटर,

संगमेश्वरात १३ मिलीमीटर तर रत्नागिरी शहरात ११ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

<><><><><>

भारत विरुद्ध न्यूझीलंड बंगळुरु कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्याच्या तिसऱ्या दिवसाच्या खेळात आज न्यूझीलंडचा पहिला डाव ४०२ धावांवर संपला. पहिल्या डावात न्यूझीलंडला ३५६ धावांची आघाडी मिळाली आहे. रचिन रवींद्रच्या शतकी खेळीच्या बळावर न्यूझीलंडला ही धावसंख्या उभारता आली. भारताच्या दुसऱ्या डावाला सुरुवात झाली असून शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १ बाद ७५ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण अफ्रिका यांच्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या महिन्याच्या २२ तारखेपासून रशियाच्या दोन दिवसीय दौऱ्यावर जाणार आहेत. कझानमध्ये होणाऱ्या या शिखर परिषदेत जागतिक विकास आणि सुरक्षिततेसाठी बहुपक्षियतेला बळकटी देण्याबाबत आणि प्रमुख जागतिक मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. यावेळी परिषदे दरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी  ब्रिक्स सदस्य देशांचे प्रधानमंत्री आणि निमंत्रित नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेणार असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

//<><><><><>//